## *राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक*

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**क्र.रामाआ/नाशिक/तक्रार क्र. : ३९४/२०२२/नाशिक**

१ श्री. नारायण शांताराम कसबे : तक्रारदार
रा. वाडगांव, ता.जि. नाशिक.

**विरुध्द**

१ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
उप अधिक्षक,
भुमी अभिलेख यांचे कार्यालय,
जुने सि.बि.एस. जवळ, शरणपुर रोड,
नाशिक, ता.जि. नाशिक.

**सुनावणी दिनांक - १३/०१/२०२३**

तक्रारदार यांनी दिनांक ०५/०९/२०२२ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये दिनांक १३/०१/२०२३ रोजी सुनावणीसाठी तक्रारदार उपस्थित होते. तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

आयोगाने द्वितीय अपील क्रमांक ९९६/२०२१/नाशिक वरील निर्णय दिनांक ०७/०४/२०२२ अन्वये पुढीलप्रमाणे आदेश दिले आहेत. "विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप अधिक्षक, उप अधिक्षक भूमी अभिलेख यांचे कार्यालय, जुने सि.बि.एस. जवळ, शरणपूर रोड, नाशिक यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या मुदतीत विद्यमान जन माहिती अधिकारी तथ मुख्यालय सहायक, नाशिक व रेकॉर्ड किपर यांचे पथक गठीत करुन अपिलार्थी यांनी दिनांक १३/०१/२०२१ रोजीच्या माहिती अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीचा कार्यालयातील अभिलेख कक्षामध्ये शोध घ्यावा. माहिती उपलब्ध झाल्यास अपिलार्थीस पुरवावी. तथापि, माहिती अभिलेख कक्षात आढळ न झाल्यास सदर माहिती का उपलब्ध नाही व त्यास कोण जबाबदार आहे, याची चौकशी करुन जबाबदारी निश्चित करावी आणि त्याबाबतचे नोटराईज्ड शपथपत्र विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगास समक्ष सादर करावे."

तक्रारदार यांनी त्यांच्या दिनांक ०५/०९/२०२२ रोजीच्या तक्रार अर्जात नमुद केले आहे की, त्यांच्या दिनांक १३/०१/२०२१ रोजीच्या माहिती अर्जासंदर्भात संबंधित प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०३/०८/२०२२ रोजी उत्तर देवून जाणुनबुजून चुकीची माहिती दिलेली आहे व नक्कला मिळून येत नाहीत असे उत्तर देवून ज्या दस्तऐवजांची आवश्यकता नाही त्या घेवून जावेत असे कळविलेले आहे.

सुनावणीदरम्यान तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सांगितले की, आयोगाच्या द्वितीय अपील क्रमांक ९९६/२०२१/नाशिक वरील दिनांक ०७/०४/२०२२ रोजीचा पारित आदेश दिनांक १५/०७/२०२२ रोजी प्राप्त झाला होता. आयोगाच्या आदेशानुसार मुख्यालय सहायक, नाशिक व रेकॉर्ड किपर यांचे पथक गठीत करुन तक्रारदारास दिनांक ०३/०८/२०२२ रोजीच्या पत्रान्वये मौजे वाडगांव ता.जि. नाशिक येथील गट नं. ५४ सर्व्हे नं. २१

चा हिस्सा नं. २ चा नकाशा व नियम ९ (१) व ९ (२) प्रमाणे नकाशा अभिलेखात आढळ झाला नाही. अभिलेखात उपलब्ध असलेले आकारफोड पाहता सर्व्हे नं. २१ चे पोटहिस्से झाल्याचे दिसून येते परंतु सदरचे हिस्से साधारणत: सन १९४० चे पुर्वी झाल्याचे दिसुन येते. त्यामुळे सदरची पोटहिस्सा फाळणी साधारणत: ८० वर्षे पुर्वीचे असल्याने व कागदाचे आयुर्माण पाहता सातत्याने हाताळणीमुळे सदरचे कागद जिर्ण होऊन नष्ट झाल्याची शक्यता आहे. त्यामुळे सदरचा सर्व्हे नं. २१ चा फाळणी नकाशा आपणास पुरविता येणार नाही. तसेच आपण मागणी केलेला ९ (१) व ९ (२) असा एकत्रीत नकाशा इकडील अभिलेखात दिसून आला नाही. तथापी, ९ (१) म्हणजे एकत्रीकरण पुर्वीची नकाशाची स्थिती व ९ (२) असा एकत्रिकरणा नंतरचा गटाचा नकाशा अभिलेखात उपलब्ध आहे. त्यामुळे या उपलब्ध अभिलेखाच्या आधारे ९ (१) व ९ (२) ची नकाशाची स्थिती समजू शकते. तरी सदरचा गट बुक नकाशा व गांव नकाशाची नक्कल आपणास पुरविण्यात येईल, असे कळविण्यात आले होते. तसेच याबाबत सविस्तर नोटराईज्ड शपथपत्र इकडील पत्र क्र. आस्था/मौ.वाडगांव/गट नंबर ५४/मा.अ.अ./द्वि. अ.क्र. ९९६/२०२१/शपथपत्र/२०२२ दिनांक ०१/०९/२०२२ रोजीच्या पत्रान्वये आयोगास सादर करण्यात आले आहे. त्याची प्रत आयोगास सादर करीत आहे. तसेच तक्रारदाराने नमुद केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या कडील दिनांक ०३/०८/२०२२ रोजीचे पत्र प्राप्त झाले असुन गट बुक नकाशा, सर्व्हे नंबर नकाशा व गांव नकाशा नक्कल प्राप्त झाली आहे.

सुनावणीदरम्यानचा युक्तीवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून येते की, आयोगाच्या उपरोक्त नमूद द्वितीय अपील क्रमांक ९९६/२०२१/नाशिक वरील दिनांक ०७/०४/२०२२ रोजीच्या पारित आदेशानुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांनी वर नमूद केल्यानुसार तक्रारदार यांना कार्यालयातील उपलब्ध माहिती पुरविल्याचे स्पष्ट होते. तसेच आयोगाच्या आदेशानुसार त्यांनी केलेल्या कार्यवाही बाबत सविस्तर नोटराईज्ड शपथपत्र आयोगास सादर केले आहे. यावरुन तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी तक्रारदार यांना माहिती पुरविण्यास हेतुपुरस्सर टाळाटाळ केल्याचे दिसून येत नाही, ही बाब विचारात घेता तक्रार निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. त्यामुळे तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य असून प्रस्तुत तक्रारीत काहीही तथ्य नाही.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत तक्रार क्रमांक ३९४/२०२२/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

**(समीर सहाय)**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

**क्रमांक : रामाआ- नाशिक/ तकार क्र./३९४/२०२२/नाशिक ओ-** २८७ **दिनांक-** 22/02/2023